एक्झिट पोलचे निकाल समोर येताच मविआच्या हालचाली सुरु >> पान 2

मतांची वाढलेली टक्केवारी ही नेहमीच सत्तेच्या विरोधात असते- जितेंद्र आव्हाड >> पान 3

विधानसभेच्या मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज >> पान 4

**सुविचार**

ग्रंथहीन घर म्हणजे देहहीन शरीर.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 103 ■ शुक्रवार, दि. 22 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



बिग बॉस मराठी ५ फेम अंकिता वालावलकरनं केला चाहत्यांना प्रश्न, होणाऱ्या पतीसह फोटो व्हायरल... आतील पान

## लहान पक्ष आणि अपक्ष सरकार बनवणार बच्चू कडू यांचा विश्वास



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** लहान पक्ष आणि अपक्ष मिळून सरकार बनविण्याची तयारी असून वेळप्रसंगी आघाडी किंवा युतीला पाठिंबा द्यावा लागेल, सत्तेत मात्र लहान पक्ष किंवा अपक्ष राहतील, असा विश्र्वास प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी व्यक्त केला. यावेळी बच्चू कडू म्हणाले की, मतदानाचा टक्का वाढायला विविध कारणे आहेत, तर राजकारणात काहीही होऊ शकते, झारखंड मध्ये एक आमदार मुख्यमंत्री होऊ शकतो. तर इथे परिस्थिती बघता प्रहारचा मुख्यमंत्री होऊ शकतो, निवडणुकीत लाडक्या बहीण योजनेचा परिणाम दिसेल, त्याच हिशोबाने योजना सरकारने आणली होती. आमचे १७ मुद्दे आहेत, हे मुद्दे घेऊन आम्ही समोर जात आहे. महाविकास आघाडीतील कुठले पक्ष एकत्र राहणार नाही त्यांना आमच्यासोबत यावे लागेल. असे मत प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी व्यक्त केले.

## अदानी समूहाच्या शेअर्समध्ये भूकंप; थेट २० टक्क्यांपर्यंत कोसळले स्टॉक्स!

नवी दिल्ली : हिंडेनबर्ग रिसर्च रिपोर्टमुळे अडचणीतून सावरलेला अदानी समूह पुन्हा गोत्यात आला आहे. आज शेअर उघडताच सर्व स्टॉक धडाधड कोसळल्याचे दिसून आले. गौतम अदानी यांच्यावर लाच आणि फसवणूकीच्या आरोपामुळे याचा जोरदार फटका अदानी समूहाच्या शेअर्सला बसला आहे.

समूहातील सर्व १० लिस्टेड कंपन्यांचे शेअर्स घसरले. अदानी एनर्जी सोल्यूशन्सचा शेअर २० टक्क्यांनी घसरून ६९७.७० रुपयांवर आला आणि शेअरला लोअर सर्किट लागले आहे. त्यामुळे याचा मोठा झटका गुंतवणूक दारांनाही बसला आहे.

नेमके प्रकरण काय?

अदानी यांच्यावर सौर प्रकल्पांचे कंत्राट आणि वित्तपुरवठा करण्यासाठी मोठी लाच दिल्याचा आरोप असून त्यांनी ही बाब अमेरिकन गुंतवणूकदारांपासून लपवली आहे. त्यामुळे अमेरिका न्यायालयाने गौतम अदानी यांना लाचखोरी आणि फसवणुकीचा आरोपाखाली दोषी ठरवले आहे. या संपूर्ण प्रकरणात अदानी यांचा पुतण्या आणि अदानी ग्रीन एनर्जीचे कार्यकारी संचालक सागर अदानी आणि कंपनीचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी विनीत जैन यांच्यासह अन्य आरोपी आहेत.

कोणत्या शेअरमध्ये किती घसरण?

अदानी ग्रीन एनर्जी – १९.१७ टक्के
अदानी टोटल गॅस – १८.१४ टक्के
अदानी पॉवर – १७.७९ टक्के
अदानी पोर्ट्स – १५ टक्के
अंबुजा सिमेंट – १४.९९ टक्के
एसीसी – १४,५४ टक्के
एनडीटीव्ही – १४.३७ टक्के

**एक्झिट पोलवाल्यांसोबत माझी अगोदरच चर्चा झाली होती! पण गोंधळच झाला !... त्यांनी आम्हाला १५० जागा मिळण्याचा दावा केला. ...आम्ही तर १३० जागांवरच निवडणूक लढविली!**



# बाण चालणार की मशाल पेटणार

# मेहकर विधानसभेत काट्याची टक्कर

## ■ रायमुलकर चौकार लगावणार की खरात विकेट घेणार
## ■ मेहकर विधानसभा मतदारसंघात चुरशीची लढत

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर:** मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. संजय रायमुलकर यांनी आपल्या शिवसेनेच्या बाणावर विधानसभेच्या राजकीय मैदानात आतापर्यंत तिघांना चित करून धूळ चारली आहे. तर यावेळेसही विजयाचा चौकार मारण्यासाठी त्यांनी विधानसभा निवडणूक संपूर्ण ताकतीनिशी लढली आहे. मात्र यावेळेस शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत झाल्याने ते विजयाचा चौकार मारण्यात यशस्वी होतात की, सिद्धार्थ खरात हे शिवसेनेचा हा गड आपल्या ताब्यात घेण्यात बाजी मारतात, याबाबत मतदार संघात चर्चेला उधाण आले आहे. मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा कायम बालेकिल्ला राहिलेला आहे. या ठिकाणी शिवसेनेच्या उमेदवाराने प्रत्येकी वेळी मतामध्ये लीड घेत विक्रम केलेला आहे. पूर्वी मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघात शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस किंवा शिवसेना विरुद्ध काँग्रेस अशी लढत झालेली आहे. या लढतीमध्ये प्रत्येक वेळेस शिवसेनेने बाजी मारली असून संजय रायमुलकर यांनी आमदार म्हणून प्रत्येक वेळेस प्रचंड मताधिक्याने विजय संपादन



केला आहे. मात्र यावेळेस शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत झाल्याने मतदार संघात अत्यंत चुरशीचा सामना रंगला आहे. काट्याच्या या लढतीत आता कोण विजयी होणार याबाबत मात्र राजकीय वर्तुळात चर्चेला पेव फुटले आहेत. तर राजकीय वर्तुळातील तज्ञ ही परफेक्ट अंदाज लावण्यात कमी पडत असल्याचे चित्र मतदार संघात निर्माण झाले आहे. २००९ मध्ये शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अशी लढत या मतदारसंघात झाली होती. यामध्ये शिवसेनेचे उमेदवार संजय रायमुलकर यांनी ९१ हजार ४७५ मते मिळवून ३३ हजार ९५ मतांनी विजय संपादन केला होता. तर त्यांच्या विरोधी गटाचे असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार हे केवळ ५८ हजार ३८० मतावर थांबले होते. त्यानंतर २०१४ मध्ये शिवसेना विरुद्ध काँग्रेस अशी लढत मेहकर विधानसभा मतदारसंघात झाली. या लढतीमध्ये सुद्धा आमदार संजय रायमुलकर यांनी पूर्वीपेक्षा जास्त मतांनी विजय संपादन केला. २०१४ मध्ये संजय रायमुलकर यांना ८०३५६ मते मिळाली. तर त्यांच्या विरोधी गटाचे काँग्रेसचे उमेदवार लक्ष्मणराव घुमरे यांना केवळ ४४ हजार ४२१ मते मिळाली. यावेळी संजय रायमुलकर यांनी ३५ हजार ९३५ मतांनी विजय मिळवत जल्लोष केला. त्यानंतर सन २०१९ मध्ये आमदार संजय रायमुलकर यांनी विजयाची हॅट्रिक मारली. तब्बल ६२२०२ मतांनी त्यांनी घवघवीत यशाने विजय संपादन केला. सन २०१९ मध्ये आमदार संजय रायमुलकर यांना तब्बल १ लाख १२ हजार ३८ मते मिळाली, तर त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे उमेदवार अनंत वानखेडे यांना केवळ ४९ हजार ८३६ मते मिळाली. यावेळेसही आमदार संजय रायमुलकर यांनी तब्बल दुप्पट मताच्या फरकाने विजय संपादन केला. यावेळेस मात्र शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत झाल्याने मेहकर विधानसभा मतदारसंघात अत्यंत चुरशीचा सामना रंगला आहे. यावेळेस सिद्धार्थ खरात यांनी काट्याची लढत दिल्याने आमदार संजय रायमुलकर हे विजयाचा चौकार मारण्यास यशस्वी होतात. की उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे उमेदवार सिद्धार्थ खरात हे मेहकर विधानसभा मतदारसंघ आपल्या ताब्यात घेऊन शिवसेनेची मशाल पेटवतात. याकडे मतदारसंघासह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेले आहे.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

### गटातटाचे राजकारण संजय रायमुलकर यांच्या पथ्यावर

मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय रायमुलकर यांनी शिवसेना पक्षाकडून आतापर्यंत तीन वेळा विजय संपादन केलेला आहे. मेहकर मतदार संघात शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस किंवा शिवसेना विरुद्ध काँग्रेस असा सामना आतापर्यंत रंगला आहे. त्यामुळे मतदारसंघातील गटातटाचे राजकारण व शिवसेनेचे हिंदुत्ववादी मतदान हे प्रत्येक वेळेस आमदार संजय रायमुलकर यांच्या पथ्यावर पडले आहे. त्यामुळे त्यांचा विजय हा प्रत्येक वेळेस जास्त मतांनी झाला आहे. यावेळेस मात्र शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत झाली असून त्यातही उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेसोबत मतदारसंघातील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस यांचे मतदार असल्याने या यावेळची निवडणूक ही गत पंचवीस वर्षातील अत्यंत चुरशीची निवडणूक ठरली आहे. त्यामुळे या काट्याच्या लढतीमध्ये कोण विजयी होणार याबाबत राजकीय अंदाज लावले जात आहेत. शिवसेनेचा निष्ठावंत मतदार हा उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत असल्याने त्याचबरोबर काँग्रेस व शरदचंद्र पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसचे मत उबाठा शिवसेनेचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना मिळाला असल्याने त्यांची बाजू सद्धा भक्कम आहे, अशी चर्चा मतदार संघात आहे. तर संजय रायमुलकर यांना शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट व भाजपचे मताची साथ असल्याने त्यांचे विजयी सुकर असल्याचा दावा केला जात आहे. मात्र या चुरशीच्या लढतीत कोण बाजी मारतो हे आता अवघ्या काही तासातच समोर येणार असल्याचे आहे.

### गुलाल आपलाच

मेहकर विधानसभा मतदार संघात शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी प्रमुख लढत झाली आहे. तर वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार डॉ. सौ. ऋतुजा चव्हाण यांनीही चांगलीच लढत दिल्याने मोठ्या प्रमाणात मताचे विभाजन झाले आहे. त्यामुळे कोण विजयी होणार याचा अंदाज लावला जात असताना अतिउत्साही कार्यकर्त्यांकडून गुलाल आपलाच असल्याचा दावा निवडणूक निकाल लागण्यापूर्वीच केला जात आहे.तर निकाला अवघे काही तास शिल्लक राहिलेले असताना उमेदवारासह संपूर्ण मतदार संघाचे लक्ष हे निकालाकडे लागले आहे.

## वाढलेल्या टक्केवारीचा महाविकास आघाडीकडे कौल

### नाना पटोले यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर/प्रतिनिधी :** आमच्या सर्व्हे नुसार महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे, लाडकी बहीण योजनेमध्ये तरुणींची मते जास्त आहेत. मात्र या तरुणींनी बेरोजगारीमुळे भाजपला नाकारले आहे. वाढलेल्या मतदानाच्या टक्केवारीत तरुणांचे मत जास्त आहेत, या सर्वांच्या मताचा कौल महाविकास आघाडीकडे असणार आहे.अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नागपूर येथे प्रसारमाध्यमांना दिली. यावेळी नाना पटोले म्हणाले की, मुख्यमंत्री पदा संदर्भात कुठलीही चर्चा नाही, निकालानंतर महाविकास आघाडीचे तसेच काँग्रेस हायकामंड निर्णय घेईल, त्यावर प्रतिक्रिया देणे मी बरोबर नाही असे मत त्यांनी व्यक्त केले. महाराष्ट्रात काँग्रेस ७५ च्यावर जागा जिंकेल, शरद पवार, उद्धव ठाकरे, संजय राऊत, राहुल गांधी, माल्लिकार्जुन खरगे हे पक्षश्रेष्ठी आहेत. मुख्यमंत्री पदावर प्रतिक्रिया देणे बरोबर नाही, सर्व काँग्रेसच्या उमेदवारांशी बोलणार मतमोजणी संदर्भात सगळ्या सूचना देणार आहोत. काही सीट या घासून चालत असल्यामुळे त्या जिंकू पण, थोडी टफ झाल्यास हरियाणामध्ये ज्या पद्धतीने भाजपने घोळ घातला, तसा घोळ इथे घालण्यास नाकारता येत नाही, त्यामुळे आम्ही अलर्ट राहणार आहोत मी स्वतः उद्या सर्व उमेदवारांशी बोलणार आहे. १७५ यावर महाविकास आघाडीच्या जागा येथील तसेच ७५ च्या जवळपास आणि त्यापेक्षा अधिक काँग्रेस आमदार निवडून येतील, काँग्रेसचा स्ट्राईक सर्वात चांगला असेल, आमच्यापेक्षा जास्त भांडण राष्ट्रवादी आणि शिंदे गटात आहे.– भाजपने फतवा काढला आहे की एकनाथ शिंदेच्या उमेदवारांना मतदान करू नका हे चालत राहणार, निकालानंतर महाराष्ट्रात घडामोडी होतील, भाजपबरोबर कोणीच राहायला तयार नाही, त्यामुळे खूप मोठ्या घडामोडी होणार आहेत. त्या घडामोडीवर आम्ही लक्ष ठेवून आहोत. बंडखोरांच्या संपर्कात राहावे लागते, दुसऱ्या पक्षात देखील खूप गडबडी सुरु आहेत, त्यावर आम्ही लक्ष ठेवून आहोत. निवडून आलेल्या आमदारांना तातडीने हलवण्याची तयारी आमची आहे, भाजपने राजकीय व्यवस्थेत आमदार फोडण्याची जी परंपरा आहे, त्यामुळे आम्ही अलर्ट राहू सगळीकडे नजर ठेवून आहोत. त्या पद्धतीने काम करणार आहे, आम्ही मुंबईत राहणार आहोत. अमेरिकेबरोबर अदाणींवर भारतातही कारवाई व्हावी,अशी मागणी यावेळी त्यांनी केली. भाजपने महाराष्ट्रात नोट जिहाद आणि दारू जिहाद केला. त्यामुळे महाराष्ट्रातील लोकांमध्ये आहे चिड आहे. महाविकास आघाडीची उद्या बैठक आहे. २५ नोव्हेंबरला नवीन सरकार येणार आहे, आम्ही मुंबईत राहू, राज्यपालांकडे जाऊ, असा विश्वास यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांन व्यक्त केला.

## महाराष्ट्रात महायुतीचचं सरकार येणार, फडणवीसांना विश्वास

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** मतदानाची टक्केवारी वाढते, तेव्हा भाजप आणि मित्रपक्षाला फायदा होतो महाराष्ट्रात मतदानाची टक्केवारी वाढली आहे. आजवरचा अनुभव आहे की, जेव्हा जेव्हा मतदानाची टक्केवारी वाढते, तेव्हा भाजप आणि मित्र पक्षालाला त्याचा फायदा होतो असे वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. मला विश्वास आहे की त्याचा फायदा आम्हाला मिळेल आणि महाराष्ट्रात आमचं सरकार स्थापन होईल असे फडणवीस म्हणाले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूर विमानतळावरुन मुंबईला रवाना झाले. त्यापूर्वी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

यावेळी महिलांचा देखील मतदानाचा टक्का वाढल्याचं दिसत आहे. मी काही मतदारसंघात संपर्क केले, तिथून मला फीडबॅक मिळाला आहे की महिलांची मतदानाची टक्केवारी वाढल्याचे फडणवीस म्हणाले. लाडकी बहीण योजनेमुळे महिलांची मतदारांची टक्केवारी वाढल्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे देखील फडणवीस म्हणाले. आम्ही अजूनही कोणत्याही अपक्ष उमेदवाराशी संपर्क साधला नसल्याचे फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्रीपदा संदर्भात अद्याप कोणतीही चर्चा झालेली नाही. परवा निकाल आल्यानंतर आम्ही तिन्ही पक्ष बसू आणि चांगला निर्णय करु अशी माहिती यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मतदानाची टक्केवारी ज्या पद्धतीने वाढली आहे, कारण लोकांना सरकारबद्दल थोडी आपुलकी वाटते असं त्याचा अर्थ असल्याचे फडणवीस म्हणाले.

राज्यात विधानसभा निवडणुकीत मतदारांनी ३० वर्षाचा मतदानाचा विक्रम मोडीत काढताना भरभरून मतदान केलं आहे. २०२४ च्या सर्वात लक्षवेधी आणि राजकारणाची खिचडी झाली असतानाच ६५.१ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. त्यामुळे या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीकडून जो जोरदार प्रचार करण्यात आला त्याचा परिणाम मतदानावरही दिसून आल्याचे मानले जात आहे. दोन्ही पक्षांचे मतदार घराबाहेर पडल्याचे दिसून येत आहे. राज्यातील मतदानाचा उच्चांक कोल्हापूर जिल्ह्यात झाला असून ७६ टक्के मतदान झालं आहे. राज्यातील सर्वाधिक मतदान करवीर विधानसभा मतदारसंघात ८४.७९ टक्के मतदान झालं आहे. दरम्यान, मतदानानंतर काल एक्झिट पोल आले आहेत. यानुसार महायुतीच्याच जागा जास्त येणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मात्र, कोणत्या पक्षाला किती जागा मिळाल्या याबाबतची खरी परिस्थिती २३ नोव्हेंबरलाच स्पष्ट होणार आहे.

## समाजवादी विचारधारेचे पाईक मुलायमसिंग यादव

समाजवादी पक्षाचे संस्थापक आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री तसेच देशाचे माजी संरक्षण मंत्री मुलायमसिंग यादव यांची आज जयंती. मुलायमसिंग यादव यांचा जन्म २२ नोव्हेंबर १९३९ रोजी उत्तर प्रदेशातील सैफई या गावात झाला. मुलायम सिंग यांनी आग्रा विद्यापीठातून एम. ए व जैन इंटर कॉलेज करहल मधून बीटी केले. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षीच त्यांनी राजकीय राजकीय चळवळीत भाग घेतला. १९५४ साली वयाच्या पंधराव्या वर्षी समाजवादी नेते डॉ राम मोहन लोहिया यांच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. जेष्ठ समाजवादी नेते डॉ राम मनोहर लोहिया यांना ते गुरू मानत. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊनच त्यांनी समाजवादी आंदोलनात भाग घेतला. १९६७ साली मुलायमसिंग यादव युनायटेड सोशालिस्ट पक्षाच्या तिकिटावर प्रथमच विधानसभेत निवडून गेले. १९७५ साली जेंव्हा देशात आणीबाणी घोषित झाली तेंव्हा या आणीबाणीला मुलायमसिंग यादव यांनी कडवा विरोध केला. आणीबाणीच्या काळात मुलायमसिंग यादव यांना १९ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर काँग्रेसला विरोध करण्यासाठी जो जनता परिवार तयार झाला होता त्यात मुलायमसिंग यांची भूमिका खूप महत्वाची होती. मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादव, रामविलास पासवान, बिजू पटनाईक, चंद्रशेखर हे जनता परिवारातील त्यावेळचे तरुण तुर्क नेते होते. या नेत्यांनी मिळून पुढे जनता दल या पक्षाची स्थापना केली. १९८९ साली हा पक्ष केंद्रात सत्तेवर आला मात्र कार्यकाळ पूर्ण करण्याआधीच हे सरकार पडले. पुढे जनता दलात फूट पडली. मुलायमसिंग यादव हे ही जनता परिवारातून बाहेर पडले आणि ४ नोव्हेंबर १९९२ रोजी त्यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली. १९९६ साली जेंव्हा केंद्रात तिसऱ्या आघाडीची सत्ता आली तेंव्हा मुलायमसिंग यादव हे पंतप्रधान पदाचे प्रबळ दावेदार होते मात्र काही कारणांनी त्यांना पंतप्रधान होता आले नाही. एच डी देवेगौडा हे भारताचे पंतप्रधान बनले. एच फी देवेगौडा यांच्या मंत्रिमंडळात ते संरक्षण मंत्री बनले. पण हे सरकारही जास्त काळ टिकले नाही त्यानंतर आय. के. गुजराल पंतप्रधान बनले त्यांच्या मंत्रिमंडळात देखील ते मंत्री बनले. याकाळात त्यांनी भाजपला प्रखर विरोध केला. त्यामुळे ते काँग्रेसच्या जवळ गेले असे मानले जात होते मात्र १९९९ साली जेंव्हा काँग्रेसने केंद्रात सत्ता स्थापनेचा प्रयत्न केला तेंव्हा मुलायमसिंग यादव यांनी त्यांना साथ दिली नाही. दरम्यानच्या काळात त्यांनी उत्तरप्रदेश मधील आपला वरचष्मा कायम ठेवला. उत्तर प्रदेश सारख्या देशातील सर्वात मोठ्या आणि महत्वाच्या राज्याचे ते ५ डिसेंबर १९८९ ते २४ जानेवारी १९९१, ५ डिसेंबर१९९३ ते ३ जून १९९६ आणि २९ ऑगस्ट २००३ ते ११ मे २००७ या कालावधीत ते तीनदा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री राहिले. पुढे त्यांचे सुपुत्र अखिलेश यादव हे देखील उत्तर प्रदेशचे पाच वर्षे मुख्यमंत्री राहिले. उत्तर प्रदेशच्या राजकारणातच नव्हे तर देशाच्या राजकारणात कायम मध्यवर्ती भूमिका बजावणारे मुलायमसिंग हे दिलदार राजकारणी म्हणून ओळखले जात. १० ऑक्टोबर २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने समाजवादी चळवळीची मोठी हानी झाली. मुलायमसिंग यादव यांनी आयुष्यभर समाजवादी विचारांची धुरा वाहिली. समाजवादी विचारांचे पाईक असलेल्या मुलायमसिंग यादव यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# एक्झिट पोलचे निकाल समोर येताच मविआच्या हालचाली सुरु

## जयंत पाटील-बाळासाहेब थोरातांकडून अपक्ष, बंडखोर आमदारांशी संपर्क

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विधानसभा निवडणुकीचे मतदान संपल्यानंतर विविध संस्थांच्या एक्झिट पोल्सचे निकाल समोर आले होते. यामध्ये महाविकास आघाडी आणि महायुतीला संमिश्र कौल मिळाल्याने संभ्रमाची परिस्थिती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर आता महाविकास आघाडीने फासे टाकायला सुरुवात केली आहे. राज्यात कोणत्याही आघाडीला बहुमत न मिळाल्यास अपक्षांची भूमिका महत्त्वाची ठरु शकते. त्यामुळे आता महाविकास आघाडीने बंडखोर आणि अपक्ष उमेदवारांशी संपर्क साधायला सुरुवात केली आहे.



मतदान संपल्यानंतर महाविकास आघाडीची महत्त्वाची बैठक बोलावण्यात आली आहे. तर दुसरीकडे गुरुवारी सकाळपासून महाविकास आघाडीचे प्रमुख नेते कामाला लागले आहेत. बाळासाहेब थोरात आणि जयंत पाटील यांच्या माध्यमातून जे बंडखोर विजयी होऊ शकतात, त्यांच्याशी संपर्क साधायला सुरुवात झाली आहे. मविआच्या नेत्यांनी निकालापूर्वीच बंडखोर आणि अपक्षांशी संपर्क साधायला सुरुवात केल्याने महाराष्ट्रातील राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे.

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढला आहे. त्यामुळे हा वाढीव टक्का कोणासाठी फायदेशीर ठरणार, याबद्दल तर्कवितर्क लढवले जात आहेत. महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये काँटे की टक्कर झाल्यास कोणालाही बहुमत मिळणार नाही, अशाप्रकारचेही अंदाज व्यक्त केले जात आहेत. अशावेळी बहुमतासाठी आवश्यक असणाऱ्या १४५ जागा गाठण्यासाठी अपक्ष आणि बंडखोर उमेदवारांची भूमिका महत्त्वाची ठरु शकते. केंद्रात भाजपची सत्ता असल्यामुळे अपक्षांचा ओढा साहजिकच महायुतीकडे असण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने महाविकास आघाडीने आतापासूनच अपक्ष आणि बंडखोरांशी संवाद साधायला सुरुवात केली आहे. त्यामुळे आता येत्या काही तासांमध्ये काय घडणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

एक्झिट पोल्सचे निकाल समोर आल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण वक्तव्य केले आहे. यंदाच्या निवडणुकीत महिला मतदारांची वाढलेली संख्या ही महत्त्वाची गोष्ट असल्याचे सांगितले. मी एक्झिट पोल्सच्या निकालाबाबत बोलणार नाही, त्याबाबत आमचे प्रवक्ते बोलतील. आम्ही अद्याप कोणत्याही अपक्ष उमेदवाराशी संपर्क साधला नसल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

## विधानसभा निवडणुकीच्या एक्झिट पोलनंतर सट्टाबाजाराचा अंदाज समोर; कोणाची सत्ता येणार?, महायुती की मविआ?

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील विधानसभा निवडणुकीचे मतदान संपल्यानंतर विविध संस्थांनी केलेले एक्झिट पोल समोर आले असून नावाजलेल्या सात संस्थांपैकी पाच संस्थांनी राज्यात महायुतीचे सरकार स्थापन होण्याचा अंदाज वर्तविला आहे. याचदरम्यान, एक्झिट पोल व्यतिरिक्त सट्टा बाजारही महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालांवरही करडी नजर ठेवून आहे. बिकानेर सट्टा बाजार आणि महादेव ऑनलाइन बेटिंग बाजार यांनी देखील महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालांवर काही अंदाज वर्तवले आहेत.

बिकानेर सट्टा बाजार आणि महादेव ऑनलाइन सट्टा बाजाराचा अंदाज काय?


बिकानेर सट्टा बाजार आणि महादेव ऑनलाइन सट्टा बाजाराच्या अंदाजानूसार महाराष्ट्रात महायुतीचं सरकार येईल अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत अपक्ष आणि छोटे पक्षही आपली छाप सोडू शकतात, असं भाकित वर्तवण्यात आलं आहे.

फलोदी सट्टा बाजारचा अंदाज काय?

आता फलोदी सट्टा बाजाराने महाराष्ट्र आणि झारखंडमधील निवडणुकीच्या निकालांविषयी भाकीत केले आहे. त्यानुसार महाराष्ट्रात महायुतीला २८८ पैकी १४४ ते १५२ जागांवर विजय मिळू शकतो. महाराष्ट्रात बहुमतासाठी १४५ जागांची गरज आहे. त्यामुळे फलोदी सट्टा बाजाराचा अंदाज खरा ठरल्यास राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येईल. तर महाविकास आघाडी महायुतीला जोरदार टक्कर देईल, असा अंदाज आहे. भाजपला ८७ ते ९० जागा मिळू शकतात, असा फलोदी सट्टा बाजाराचा अंदाज आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सत्तास्थापनेसाठी महायुतीवर ४० पैसे तर महाविकास आघाडीवर २ ते २.५० रुपयांचा भाव लागताना दिसत आहे.

# चांगल्या व्यायामासह चालणेही आवश्यक

शरीर निरोगी राहण्यासाठी अनेक लोक योगाचा, व्यायामाचा अवलंब करतो. बरेच लोक जिममध्ये जाऊन घाम गाळतात. परंतु याउलट दररोज सकाळी फक्त ३० मिनिटे चालणे फायदेशीर मानले जाते. सकाळी हवामान स्वच्छ ताजे असते. मोकळ्या हवेत चालण्याने हृदय व मन निरोगी होते. मानसिक आणि शारीरिक विकासामुळे रोगांचे प्रतिबंध टाळले जाते. दिवसभर रीफ्रेश वाटल्यामुळे मूड चांगला राहतो. होय, दररोज चालणे शरीराच्या चांगल्या व्यायामासह प्रतिकारशक्ती वाढविण्यात मदत करते. यामुळे रक्ताभिसारण उत्तम होत असल्याने कर्करोगासारख्या गंभीर आजाराची शक्यता कमी असते. मात्र, कोणी किती चालावे याचेही काही नियम आहेत. चला तर, मॉर्निंग वॉक घेण्याचे फायदे आणि वयानुसार दररोज किती पावले चालले पाहिजेत, याबद्दल जाणून घेऊया.



वयानुसार कोणी किती चालावे ?

* वय ६ ते १७

मुले - १५,००० पावले

मुली - १२,००० पावले

* वय १८ ते ४०

या लोकांना १२,००० पावले चालणे आवश्यक आहे.

* वय ४० ते ४९

यांनी दररोज ११,००० पावले चालली पाहिजेत.

* वय ५० ते ५९

या लोकांनी ११,००० पावले चालावे.

* वय ६० व त्यापेक्षा अधिक

६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या लोकांनी दररोज ८,००० पावले चालणे आवश्यक आहे. यासह या वयात आरोग्यासंबंधी समस्या उद्भवू शकतात. अशा परिस्थितीत आपण आपल्या गरजेनुसार कमीतकमी चालणे ठेवू शकता.

वाचा आश्चर्यकारक फायदे

दररोज चालणे मधुमेह नियंत्रणास मदत करते. यामुळे शरीरात ग्लूकोजचे प्रमाण समान राहते. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांनी फिरायला जायलाच हवे.

चालण्यामुळे शरीराची चांगली हालचाल होते. हे हृदय निरोगी ठेवण्यास मदत करते. एका संशोधनानुसार, दररोज चालण्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि हृदयविकाराचा धोका ३२ टक्क्यांपर्यंत कमी होतो.

सकाळी चालण्यामुळे मेंदूला योग्य पद्धतीने ऑक्सिजन मिळते. अशा परिस्थितीत कम करण्याची शक्ती वाढते. मन शांत होते तसेच एकाग्रता आणि स्मरणशक्ती वाढविण्यास मदत होते.

सकाळी ताज्या हवेत चालण्याने प्रतिकारशक्ती वाढते. त्यामुळे कर्करोगासारख्या गंभीर आजाराचा धोका कमी होतो.

फेरफटका मारण्याने श्र्वसनाच्या समस्या दूर होण्यास मदत होते. योग्य प्रमाणात ऑक्सिजन मिळून फुफ्फुसाची कार्यक्षमता वाढते. त्यामुळे संबंधित आजारांचा धोकाही कमी होतो.

आजच्या काळात चुकीच्या जीवनशैली तसेच आहारामुळे लोक संधिवाताने ग्रस्त आहेत. यामुळे बर्याच लोकांना चालण्यासही त्रास होतो. एका संशोधनानुसार, मॉर्निंग वॉकमुळे सांधे आणि स्नायू बळकट होण्यास मदत होते. त्यामुळे संधिवात असलेल्या रुग्णांना दररोज फिरायला जाणे आवश्यक आहे.

आजच्या काळात प्रत्येक माणूस वेगवेगळ्या तणावाने त्रस्त आहे. दररोज २०-३० मिनिटे चालल्याने ताण कमी होण्यास मदत होते.

लठ्ठ लोकांनी दररोज मॉर्निंग वॉक करणे आवश्यक आहे. यामुळे संपूर्ण शरीराची हालचाल होते. हे ओटीपोट, कंबर, मांडीभोवती साठलेली चरबी कमी करण्यास मदत करते. तसेच शरीराला योग्य आकार मिळतो.

अशक्तपणा आणि थकवा दूर होतो

चालण्यामुळे शरीरात उर्जा संचारते. त्यामुळे अशक्तपणा, थकवा इत्यादींचा त्रास कमी होतो.

दररोज सकाळी चालल्यामुळे शरीराला योग्य ऑक्सिजन मिळते. तसेच रक्ताभिसारण चांगले होते. रोग प्रतिकारशक्ती निर्माण झाल्यामुळे हंगामी व इतर रोगांचे प्रमाण कमी होते.

# आता तुमचे आवडीचे पदार्थ खाऊनही होऊ शकतं तुमचं वजन कमी; डाएटचा 'हा' नियम पाळा

आजकाल आपल्यापैकी अनेकजण वजन कमी करण्यावर भर देतात. वजन कमी करण्यासाठी आपण ना-ना पद्धतीचा अवलंब करतो, मात्र तरीही अनेकदा वजनात घट होताना दिसत नाही. आपल्या मनात गंमतीने असा विचारही येतो की, आपल्या आवडीचे कितीही पदार्थ खाल्ले आणि तरीही आपलं वजन वाढलंच नाही, तर किती बरं होईल. मात्र तुम्हाला जसं वाटतंय, तसं खरंच घडणार असेल तर.

आज आम्ही तुम्हाला अशा एक डाएटची माहिती देणार आहोत, ज्यामध्ये तुम्ही तुमच्या आवडीचे पदार्थही खाऊ शकता आणि तुमचं वजनंही कमी होईल. तुम्हाला ही गोष्ट खोटी वाटेल, मात्र खरंच असं डाएट आहे. ८०२० असा या डाएटचा रूल आहे.

डाएटचा ८०२० नियम काय सांगतो?

वजन कमी करण्यासाठी आपण सगळे डाएट तर करतो. मात्र ८०२० हा नियम काय आहे, हे फार कमी लोकांना माहिती असेल. डाएटच्या या नियमानुसार, याअंतर्गत तुम्हाला ८० टक्के पौष्टिक आहार आणि २० टक्के तुम्ही तुमच्या आवडीचे पदार्थ खाऊ शकता.

तज्ञांच्या म्हणण्याप्रमाणे, या डाएटचा नियम तुम्हाला फॉलो करताना कॅलरीज तसंच कार्ब्स काऊंट करण्याची देखील गरज नाहीये. त्यामुळे या नियमानुसार, तुम्ही केवळ डाएट फूड न खाता तुमच्या आवडीचे पदार्थही खाऊ शकता.

कसा फॉलो कराल ८०२० डाएटचा नियम?

हे डाएट करताना तुम्ही एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, तुम्ही तुमच्या आहारामध्ये विविध रंगाच्या भाज्यांचा अधिक समावेश केला पाहिजे. तसंच ज्या भाज्यांमुळे पचनक्रिया सुधारेल अशा भाज्यांचा आणि फळांचा तुमच्या आहारात समावेश करावा. यामध्ये सिझनल भाज्या आणि फळांचा सामवेश व्हायला हवा.

८० टक्के डाएटमध्ये काय समाविष्ट कराल?

पौष्टिक आहारामध्ये तुम्ही भाज्या, फळं, मासे आणि चिकन यांचा समावेश करू शकता. त्याचप्रमाणे, डेअरी प्रोडक्टसचाही तुम्ही समावेश यामध्ये करू शकता. वजन कमी करण्यासाठी तुम्ही फॅट फ्री दुधाचा वापर करू शकता.

आवडीच्या गोष्टींमध्ये कशाचा समावेश कराल?

यामध्ये तुम्ही त्या खाद्यपदार्थांचा समावेश करावा, जे तुम्हाला भरपूर आवडतात. यामध्ये सॅच्युरेटेड फॅट, रेड मीट, अल्कोहोल, रिफाईंड कार्ब्स तसंच साखरयुक्त पदार्थांचा समावेश करू शकता. यामध्ये तुम्हाला अचानक रात्रीच्या वेळेस तुम्हाला गोड काही खावंसं वाटू शकतं. मात्र हे खाताना त्याच्या प्रमाणात कधीही वाढ होणार नाही, याची काळजी घ्या.

# ताप, डोकेदुखी असेल तर दुर्लक्ष करु नका, होऊ शकतो 'हा' भयंकर आजार!

कधी पाऊस, कधी ऊन, कधी थंडी या दिवसात हवामानात सतत होणारा बदलामुळे विषाणूजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे. व्हायरल इन्फेक्शनची सर्वात वाईट गोष्ट म्हणजे ते एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरतात. अनेकदा लोक सामान्य ताप आणि व्हायरल ताप समजून दुर्लक्ष करतात. मात्र ताप ,डोकेदुखी यासारखे आजार असतील तर वेळीच सावध व्हा. कारण भारतात जापानी तापाची साथ पसरली आहे.हा ताप सामान्य तापमान नाही तर अतिशय धोकादायक तापमान आहे. त्यामुळे रुग्णाला जीव गमवावा लागतो. याच तापाचा कहर सध्या भारतात पसरला आहे. मध्य प्रदेशातील काही जिल्ह्यांमध्ये जापानी तापाची लक्षणे नष्ट करण्यासाठी मोठी मोहीम राबवली जात आहे. अशा परिस्थितीत १ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांच्या आरोग्याबाबत विशेष काळजी घेण्याचा सल्ला आरोग्य तज्ज्ञ देतात.

जापानी इन्सेफलाइटिसचा उद्रेक दरवर्षी देशातील सुमारे २० राज्यांमध्ये पसरतो. विशेषत:



उत्तर प्रदेशातील गोरखपूरमध्ये २०१७ मध्ये जापानी उष्णतेमुळे एकाच दिवसात ३० लोकांचा मृत्यू झाला होता. बिहारमध्ये दरवर्षी १५० हून अधिक मुलांचा याच रोगामुळे मृत् झाला होता. डब्ल्यूएचओच्या म्हणण्यानुसार, या आजाराचे पहिले प्रकरण १८७१ मध्ये समोर आले होते. डासांपासून पसरणारा हा व्हायरस डेंग्यू, पिवळा ताप, आणि पश्चिमी नील व्हायरसच्या जातीचा आहे.

एन्सेफलायटीस किंवा जापानी ताप म्हणजे काय?

एन्सेफलायटीस हा जीवघेणा आजार आहे. हा एक गंभीर आजार आहे ज्यामध्ये तुमच्या मेंदूला सूज येते. यासाठी पूर्व-उपचार आवश्यक आहेत. या आजाराची शिकार कुणीही होऊ शकते. पण याचा सर्वात जास्त धोका लहान मुले आणि म्हाताऱ्या लोकांना असतो.

जापानी एन्सेफलायटीसची लक्षणे...

जपानी एन्सेफलायटीसमध्ये ताप आल्यावर मुलांची विचार करण्याची क्षमता, समजून घेण्याची क्षमता आणि ऐकण्याची क्षमता कमी होते. कडक तापबरोबरच पुन्हा पुन्हा उलटीचा त्रास होतो. हा आजार ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात जास्त पसरतो. आणि १ ते १४ वय वर्षांच्या मुलांना आपल्या तावडीत घेतो.

जापानी एन्सेफलायटीस टाळण्यासाठी उपाय...

- नवजात मुलाचे वेळेत लसीकरण करणे.
- स्वच्छतेची काळजी घेणे.
- घाणेरडे पाणी जमा होऊ देऊ नये. सोबतच स्वच्छ आणि उकळलेले पाणी प्यावे.
- पावसाच्या सिजनमध्ये मुलांची व्यवस्थित काळजी घेणे.
- थोडाही ताप असल्यावर मुलांना डॉक्टरकडे घेऊन जाणे.

जपानी तापावर उपचार काय?

जपानी तापाच्या विळख्यात एकादी व्यक्तीला झाला असेल तर त्यानं त्यावर त्वरित उपचार घेणं गरजेचं असतं. जापानी तापाच्या व्यक्तीला हॉस्पिटलमध्ये तात्काळ दाखल केलं जातं. त्याच्यावर तात्काळ उपचार सुरू करणंही आवश्यक असतं. त्याला ऑक्सिजन मास्कही लावला जातो. कारण जपानी ताप आलेल्या व्यक्तीला ऑक्सिजन मास्क लावला जातो. व्यक्तीची प्रकृती बिघडल्यास वॅक्सिनही दिलं जातं.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मतांची वाढलेली टक्केवारी ही नेहमीच सत्तेच्या विरोधात असते- जितेंद्र आव्हाड

दैनिक आपला विदर्भ



**ठाणे/प्रतिनिधी :** राज्यात महाविकास आघाडीच सरकार येईल आणि महायुतीला सत्तेची आलेली मुजोरी ही जनतेला जनताच जिरवेल, वाहिनींना बारामतीत थांबवणे, दाराबाहेर उभे करणे, अनिल देशमुख यांच्यावर दगडफेक करुन त्यांचे डोके फोडणे, जागोजागी पैसे नेणे, विनोद तावडे सारख्या मोठ्या नेत्याच्या आजुबाजुला पाच कोटी मिळतात.माणुसकी नसलेली माणसे आता राजकारणात आली आहेत. सर्व भागातील आमदार येतील त्यांची संख्या १६० च्यावर असेल, मी मुख्यमंत्री होणार बोलल्यावर मला सुद्धा आनंद वाटतो. एकनाथ शिंदे किंवा देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होणार की नाही याच्याशी मला काही घेणे देणे नाही, आमचा मुख्यमंत्री होतोय हे म्हटल्यावर आम्ही कशाला त्यांचं बघायला जाऊ, परिवर्तन होणार असून महाविकास आघाडी सत्तेत येणार आहे. मतदानाची वाढलेली टक्केवारी टक्केवारी ही नेहमीच सत्तेच्या विरोधात असते, सत्तेवर राग असतो म्हणून लोकं बाहेर पडून भरभरून मतदान करतात. तुमची लाडकी बहीण योजना चांगली आहे, वाढलेले भाव आणि महागाई हे देखील बहिणींच्या लक्षात आलेले आहेत. आम्ही महालक्ष्मी योजना काढली, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री म्हणतात की माझीच लाडकी बहीण यात लफडे झाले,दीड हजार रुपये दिले म्हणजे प्रत्येकाने पाचशे पाचशे रुपये दिले की तिघांनी वाटून घेतले, आता पैसे वाढवून देणार कारण त्यांच्या बहिणी वाढल्या, बहिणींवरून आता त्यांच्या स्पर्धा लागली आहे. जेव्हा जास्त मतदान होते तेव्हा लोक रागाने बाहेर पडतात. आतापर्यंत निवडणुका खेळीमेळीच्या वातावरणात व्हायच्या आणि दिवस निघून जायचे, आता पैसे वाटप, पोलिसांवर प्रचंड दबाव आणणे हे सर्व मुख्यमंत्र्यांच्या आशीर्वादाशिवाय थोडी झाले असेल, असा प्रश्नही यावेळी आव्हाड यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्र्यांचा अभिनंदन करून अजित पवारांच्या उमेदवाराला समर्थन केले. अपक्षांचा भाव वाढेल यात काही वाद नाही, आता १६५ जागा मिळाल्या तर काय करायचे हा प्रश्न आहे. शरद पवार हेच महाविकास आघाडीचे मूळ वाहक आहेत, वाहनाचा ताबा हा शरद पवारांकडे आहे. अदानी बद्दल मला काही माहीत नसते मी छोटा माणूस आहे, अदानी मोठी माणूस आहे. कुठे त्यांच्याकडे लक्ष देत बसायच असा ठोला लगावला. आता आमदार ताब्यात ठेवावेत आणि त्यांचे मोबाईलही ताब्यात ठेवावेत, आम्ही २६० जागा महाविकास आघाडी म्हणत आहोत तर घोडेबाजार करणार कुठून आम्ही फ्रान्सला जाऊ, इटली, स्विझर्लंड जाऊ, तिथून पळता येणार नाही म्हणून आम्ही चाललोय. माझा आणि गंगागिरी महाराजांचा फोटो एडिट करून लावला हे त्यांच्याच नेत्यांनी सांगितले असावे, असा फायदा झाला की तोटा आहे माहित नाही पण माणुसकी उरली नाही हे एव्हडेमात्र खर असल्याचे त्यांनी सांगितले. तर प्रतिभा पवार यांची अडवणूक प्रकरणावर बोलताना ज्या आईने तुम्हाला हाता खांद्यावर खेळवले, तुमच्या जेवणाची शिक्षणाची विचारपूस करून तुम्हाला मार्गी लावले त्यांच्याशी तुम्ही असे वागूच करू शकता असा रोष यावेळी त्यांनी व्यक्त केला. तर बीजेपी उघडपणे म्हणत असेल की मुख्यमंत्री होऊनच देणार नाही, याचा अर्थ भाजपचा कुठेतरी प्लान झाला आहे. संजय शिरसाटला पत्रकारांनी दिलेली हिंट जास्त समजते, असा टोलाही महाविकास आघाडीचे उमेदवार जितेंद्र आव्हाड यांनी लगावला.

## महत्त्वाचे...

### शिवसेना उपनेते शरद कोळी यांच्या विरोधात काँग्रेसच्या महिला आक्रमक



दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी** :शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते शरद कोळी यांच्या विरोधात काँग्रेस महिला आक्रमक झाल्या होत्या. यावेळी तणावाचे वातावरण निर्माण झाले असता पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात करून परिस्थितीवर वेळीच नियंत्रण मिळवले. दक्षिण विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या धर्मावरून वाद पेटला होता. उपनेते शरद कोळी यांनी खासदार प्रणिती शिंदे आणि माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या प्रतिमेला जोडेमारो आंदोलन केले होते. तसेच खासदार प्रणिती शिंदे यांच्या विरोधात खालच्या भाषेत टीका केल्याबद्दल काँग्रेस महिला आक्रमक झाल्या होत्या. खासदार प्रणिती शिंदें यांच्या विरोधात आंदोलन केल्याप्रकरणी शरद कोळी यांच्या विरोधात बाझार पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल केला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी शरद कोळी यांच्या कार्यालयाबाहेर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### ठाण्यात ईव्हीएम असणाऱ्या स्ट्राँग रुमबाहेर पोलिसांचा तगडा पोलीस बंदोबस्त तैनात



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीसाठी मतदान काल पार पडले. ठाण्यात ६ वाजेपर्यंत ६० टक्के मतदान झाल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे. मतदान पार पडल्यानंतर निकालाची उत्सुकता राज्यात लागली आहे. कोणत्या पक्षाचे आमदार निवडून येतील, कोणाचे सरकार स्थापन होईल यावर सध्याच्या घडीला जोरदार चर्चा सुरू आहे. तर दुसरीकडे ठाण्यात ईव्हीएम रूमबाहेर पोलिसांचा मोठा बंदोबस्त लावण्यात आला आहे. ६० तास ईव्हीएम असणाऱ्या रूमसमोर पोलिसांचा मोठा बंदोबस्त राहणार आहे. ईव्हीएम मशीनमध्ये कुठलीही छेडछाड किंवा गडबड होऊ येऊ नये यासाठी सर्व काळजी घेतली जात आहे. त्याचबरोबर ईव्हीएममध्ये २४ तास सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांवर निवडणूक आयोग आणि पोलीस कंट्रोल रूम व लक्ष ठेवून आहेत अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी मिलिंद मुंडे यांनी दिली आहे.

### उल्हासनगरमध्ये अर्धवट जळलेल्या अवस्थेत आढळला तीन वर्षीय मुलीचा मृतदेह



दैनिक आपला विदर्भ

**उल्हासनगर/प्रतिनिधी** : उल्हासनगरमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. तीन वर्षाच्या मुलीचा अर्धवट जळलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने सर्वत्रच खळबळ उडाली आहे. उल्हासनगर कॅम्प-३ येथील ओटी सेक्शन परीसरात राहणारी ३ वर्षांची चिमुकली ही १८ तारखेला बेपत्ता झाली होती. त्यानंतर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. आज उल्हासनगर कॅम्प-५ हिल लाईन पोलीस ठाण्याच्या मागील बाजूस या मुलीचा अर्धवट जळलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला आहे. मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पाठवला असून अधिकची माहिती रिपोर्ट्स आल्यावरच समोर येईल अशी माहिती पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी दिली आहे.

### ऐश्वर्या रायनंतर लेकीच्या वाढदिवसालाही अभिषेक गैरहजर, आराध्याच्या बर्थडे सेलिब्रेशनचे फोटो आले समोर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेत्री ऐश्वर्या राय आणि अभिनेता अभिषेक बच्चन यांच्या घटस्फोटाच्या बातम्या सध्या जोरात आहेत. आता ऐश्वर्याने तिच्या मुलीचा वाढदिवस एकट्याने साजरा केला. ऐश्वर्या रायने मुलगी आराध्या बच्चनचे तिच्या वाढदिवसाच्या पार्टीतील फोटो शेअर केले आहेत, ज्यामध्ये अभिषेक बच्चन गैरहजर होता. याआधी ऐश्वर्या रायच्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनपासूनही अभिषेक बच्चन लांब होता. ऐश्वर्याच्या वाढदिवसाच्या पार्टीतही तो पोहोचला नव्हता आणि आता आराध्याचा बर्थडे ऐश्वर्याने एकटीने सेलिब्रेट केला.

# बिग बॉस मराठी ५ फेम अंकिता वालावलकरनं केला चाहत्यांना प्रश्न, होणाऱ्या पतीसह फोटो व्हायरल...

**मुंबई/प्रतिनिधी :** 'बिग बॉस मराठी ५'मुळे अंकिता वालावलकर प्रसिद्धीझोतात आली. ती सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर असून तिला शोपासून सर्वत्र 'कोकण हार्टेड गर्ल' म्हणून एक नवीन ओळख मिळाली आहे. अंकिता ही 'बिग बॉस'मध्ये चाहत्यांच्या आवडत्या स्पर्धकांपैकी एक होती. अंकिता 'बिग बॉस'च्या घरात असताना ती लग्नबंधनात अडकणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. अंकितानं दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर तिच्या होणाऱ्या पतीबद्दल सांगितलं होतं. यानंतर ती लग्नबंधनात कधी अडकणार याबद्दल चर्चा सुरू झाल्या होत्या. आता अंकितानं सोशल मीडियावर तिच्या होणाऱ्या पतीबरोबरचे फोटो शेअर केला आहेत.

बिग बॉस मराठी फेम अंकिता वालावलकरनं शेअर केला फोटो : या फोटोमध्ये ती आपल्या पतीबरोबर पोझ देताना दिसत आहे. अंकिताचा पती लोकप्रिय मराठी संगीत दिग्दर्शक असून त्याच नाव कुणाल भगत आहे. 'बिग बॉस मराठी ५'मधून बाहेर पडल्यानंतर अंकिता तिच्या नात्यामुळे खूप चर्चेत आहे. आता अंकिता आणि कुणाल आता लवकरच लग्न करणार आहेत. दरम्यान अंकितानं शेअर केलेल्या फोटोच्या कॅप्शनमध्ये 'प्री-वेडिंग शूट करणं गरजेचं आहे का?' असा प्रश्न चाहत्यांना विचारला आहे. आता यावर अनेकजण आपल्या प्रतिक्रिया देत आहेत. आता अलीकडच्या काळात लग्नाआधी प्री-वेडिंग फोटोशूट करण्याचा नवीन ट्रेंड सुरू आहे. त्यामुळे अनेक जोडपे प्री-वेडिंग शूट करतात. आता या फोटोच्या कमेंट विभागात एका चाहत्यानं लिहिलं, 'क्यूट जोडी.' दुसऱ्या एकानं लिहिल,'नक्की फोटोशूट करा.' आणखी एकानं लिहिलं, 'लवकर लग्न करून मोकळे व्हा.' याशिवाय अनेकजण या फोटोवर हार्ट आणि फायर इमोजी पोस्ट करून या जोडप्यावर प्रेमाचा वर्षाव करत आहेत.

### उत्तर प्रदेशात ट्रक अन् खासगी बसची जोरदार धडक; अपघातात ५ जणांचा मृत्यू, १५ जखमी!

अलीगढ : उत्तर प्रदेशातील अलीगढमध्ये यमुना एक्सप्रेस वेवर भीषण अपघात घडल्याची बातमी समोर आली आहे. एका खासगी डबल डेकर बस आणि ट्रकची जोरदार धडक झाल्याने भीषण अपघात घडला. यामध्ये ५ जणांचा जागीच मृत्यू झाला असून १५ जण जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, उत्तर प्रदेशातील अलीगढमध्ये यमुना एक्सप्रेस वेवर मध्यरात्री अडीच वाजेच्या सुमारास हा अपघात झाला. दिल्लीहून आजमगढला जाणाऱ्या एका डबल डेकर बसने ट्रकला मागून धडक दिली. चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाल्याची शक्यत वर्तवण्यात येत आहे.

# ठाण्यातील प्रति शिर्डी म्हणून ओळखला जाणाऱ्या साईबाबा मंदिराच्या वर्धापन दिनासाठी प्रसाद म्हणून तयार केले १५ टन लाडू





दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाण्यातील वर्तकनगर येथील श्री साईबाबा मंदिराचा २३ नोव्हेंबर रोजी ३८ वा वर्धापन दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त दर्शनासाठी येणाऱ्या नागरिकांना प्रसाद म्हणून १५ टन लाडू तयार करण्यात आले आहेत. या ठिकाणी महायुतीचे उमेदवार संजय केळकर यांनी भेट देऊन पाहणी करून उत्सवाची माहिती घेतली. तसेच समितीचा नूतनीकृत कार्यालयाचे उद्घाटन यावेळी संजय केळकर यांच्या हस्ते करण्यात आले. ठाण्यातील वर्तकनगर येथील साईमंदिर हे साई भक्तांसाठी प्रति शिर्डीचे स्वरूप आहे. दरवर्षी लाखो भाविक या साई मंदिराला आवर्जून भेट देतात. याच श्री साईबाबा मंदिराचा यंदा ३८ वा वर्धापन दिन असून नागरिकांना प्रसाद म्हणून चक्क १५ टन लाडू तयार करण्यात आले आहेत. तसेच २३ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर २०२४ या तीन दिवसात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती समितीचे अध्यक्ष मंगेश बळीराम नईबागकर यांनी दिली.

दिनांक २३ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर २०२४ दरम्यान साजरा होणाऱ्या या उत्सवासाठी जवळपास एक लाखाहून जास्त साईभक्त या मंदिराला भेट देऊन आपल्या साईंचे दर्शन घेतील असा अंदाज मंदिर समितीनं व्यक्त केला आहे. यावर्षी येणाऱ्या भाविकांची संख्या एक लाखाहून जास्त असल्यानं त्यांच्या प्रसादासाठी तब्बल १५ टन लाडू बनवण्याचा संकल्प मंदिर समितीनं पूर्ण केला आहे. शनिवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० पासुन प्रसाद लाडू वाटप सोमवार दिनांक २५ नोव्हेंबर रोजी दुपारी १.०० वाजता यज्ञसमाप्ती पुर्णाहुती त्यानंतर दुपारी २.०० वा. साईबाबांच्या पावुकांची भव्य पालखी मिरवणुक इतर कार्यक्रम गायन भजन व किर्तन अशा भक्तीमय कार्यक्रमांची पर्वणी असेल. तरी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन व प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन समितीचे अध्यक्ष मंगेश बळीराम नईबागकर यांनी केले आहे.

### महायुतीचे उमेदवार अतुल सावे यांनी केले पैसे वाटप ; इम्तियाज जलील यांचा आरोप



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** :महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीसाठी काल मतदान पार पडले. छ.संभाजीनगर पूर्व विधानसभेमध्ये जे काही गोंधळ झाला त्याचे व्हिडिओ माजी खासदार इम्तियाज जलील यांनी पत्रकार परिषदेत दाखवले. भारतीय जनता पार्टी द्वारे मुंबईमध्ये एका फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये जे काही घडले ते आम्ही सगळं मीडियामध्ये पाहिलं आहे. भारतीय जनता पार्टी आणि त्यांचे मित्र एकनाथ शिंदे यांच्या उमेदवारांनी पैशाचा कसा पाऊस पाडला आहे परंतु माझं या मागच्या कारण एक आहे इलेक्शन कमिशन ऑफ इंडिया, कमिशनर, जिल्हाधिकारी याचे काय उत्तर देणार आहेत हे आम्ही बघणार आहे. केंद्र सरकारकडून असा आदेश आला आहे का की जिथे भारतीय जनता पार्टीचे शिंदे गटाचे उमेदवार असतील तिथे पैसे वाटप करतील किंवा काही जरी गोंधळ घातला तर त्यांच्यावर कोणत्या प्रकारचे कारवाई करण्यात येऊ नये असा आरोप इम्तियाज जलील यांनी केला. भारतीय जनता पार्टीच्या काही कार्यकर्त्यांनी महिला मतदारांना पैसे दिले. हा व्हिडिओ देखील त्यांनी प्रेस कॉन्फरन्स मध्ये दाखवला. पूर्व मतदारसंघांमध्ये अतुल सावे जे मुस्लीम उमेदवारांना उभे केले होते त्यांना पैसा हा अतुल सावे येणे पुरवला आहे असा आरोप माजी खासदार इम्तियाज जलीलयांनी पत्रकार परिषदेत केला आहे

# जलील यांनी जो आरोप केला त्याचा पुरावा नाही : जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ




**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : छत्रपती संभाजीनगर येथील पूर्व विधानसभा मतदार संघात पैसे वाटप करण्यात आला आहे, असा आरोप जलील यांनी केला आहे. परंतु याबाबत कोणतीही तक्रार आमच्याकडे आलेली नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी प्रसार माध्यमांना दिली. यावेळी जिल्हाधिकारी स्वामी पुढे बोलताना म्हणाले की, मी आणि अधिकारी फिरत होतो, पैसे वाटप होत असल्याची तक्रार कुणीही केलेली नाही.आपल्या शहरात अनेक लोकांकडे भारतीय निवडणूक आयोगाचा प आहे. त्यांना असं माहिती होते तर त्यांनी तक्रार का केली नाही ? त्यांनी काही माहिती दिली असती तर आम्ही चौकशी केली असती असा प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केला. तसेच आमचे अधिकारी दिवस रात्र फिरत होते, आम्हाला तक्रार मिळाली तर १० मिनिटात कारवाई केली असती, मतदान प्रक्रिया पारदर्शक झाली आहे. पैसे वाटप होत होत त्यावेळी त्यांनी का दाखवले नाही, लोकासभेचे जुने,बाहेर राज्यातले व्हिडिओ व्हायरल केले आहे. जलील यांनी तक्रार दिली तर त्यांच्यावर करावी होईल, असे सांगून यावेळी जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यात ६९.६४ टक्के मतदान झाले आहे, असल्याचे सांगितले. तसेच यावेळी नवीन मतदार आणि महिलांमध्ये उत्साह दिसला असून दि.२३ नोव्हेंबरला होणाऱ्या मतमोजणीसाठी १२६ टेबलची व्यवस्था, पोस्टल बॅलेट पेपरच्या मतमोजणीसाठी ७० टेबलची व्यवस्था करण्यात आली आहे, सैन्यातील लोकांनी जे मतदान केलं त्या मतमोजणीसाठी १२ टेबलची व्यवस्था करण्यात आली आहे, ९ विधानसभा मतदारासंघात या पद्धतीने एकूण २०८ टेबल्स लावण्यात आली आहेत. ८५२ कर्मचाऱ्यांची मतमोजणीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे, २४२ मायक्रो निरीक्षक लावले आहेत. जे केंद्र शासनाचे अधिकारी, कर्मचारी आहेत, ३००० पेक्षा जास्त पोलीस कर्मचारी, अधिकारी तैनात आहेत. मतदान झाल्यानंतर सर्व मतपेट्या या स्ट्राँग रुममध्ये सीलबंद करुन ठेवल्या आहेत, हे करत असताना उमेदवार त्यांचे प्रतिनीधी, निरीक्षक यांची उपस्थिती होती. अशी माहिती छत्रपती संभाजी नगर चे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली.

## विविध वृत्त...

### याहून जास्त क्रूर काय! नवजात स्त्री अर्भकाला इमारतीवरुन फेकलं? अंबरनाथमधील धक्कादायक घटना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अंबरनाथ पश्चिमेच्या शंकर हाइट्स या इमारतीत एका नवजात स्त्री अर्भकाला इमारतीवरून फेकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बाळ इमारतीच्या डकमध्ये आढळल्यानंतर पोलिसांना याबद्दल कळवण्यात आलं. दोन महिलांवर याप्रकरणी संशय असून, त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलं आहे. दरम्यान हे बाळ कुमारी मातेचं होतं का? यासंदर्भात सध्या तपास सुरु आहे. रात्रीच्या सुमारास हे स्त्री अर्भक जन्माला आलं असून त्याला तिथून फेकून दिल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सकाळी इमारतीमधील रहिवाशांना हे बाळ इमारतीच्या डकमध्ये दिसलं. त्यांनी स्थानिक नगरसेवक उमेश पाटील यांना याची माहिती दिली. उमेश पाटील यांनी तात्काळ पोलिसांना याची माहिती दिल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी सध्या हे बाळ ताब्यात घेऊन शासकीय रुग्णालयात पाठवलं आहे. दरम्यान याप्रकरणी पोलिसांनी दोन महिलांना चौकशीसाठी ताब्यातदेखील घेतलं आहे. हे कृत्य कोणी केलं, स्त्री जातीचं अर्भक अविवाहित मातेचं होतं का?त्याला इमारतीवरून फेकलं गेलं की आणख काही यासंदर्भात पोलीस तपास करत आहेत.

### एआर. रहमान आणि सायरा बानोच्या घटस्फोटाच्या बातमीनंतर गिटारिस्ट मोहिनी डे पतीपासून वेगळी, झाला मोठा खुलासा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** एआर. रहमान आणि त्याची पत्नी सायरो बानो यांच्या घटस्फोटामुळे चाहत्यांना एक मोठा धक्का बसला आहे. लग्नाच्या २९ वर्षानंतर हे जोडपे वेगळे झाले आहेत. दुसरी आश्चर्याची गोष्ट म्हणजे रहमान आणि त्यांच्या पत्नीनं १९ नोव्हेंबर रोजी घटस्फोटाची घोषणा केली. यानंतर काही तासांनी त्यांच्या बँडमधील सदस्य मोहिनी डेनं देखील तिच्या पतीपासून वेगळे होण्याची घोषणा करून एक मोठा झटका दिला. मोहिनीमुळे एआर. रहमान आणि सायरा बानो वेगळे झाल्याची चर्चा सोशल मीडियावर रंगत आहेत. सोशल मीडियावर लोक रहमान आणि मोहिनी नात्यात असल्याचा अंदाज लावत आहेत. या सगळ्यात रहमानच्या वकील वंदना शाह यांनी आपले मौन सोडले असून, 'मोहिनीचा एआर रहमान आणि सायरा बानो यांच्या घटस्फोटाशी काहीही संबंध नाही. हा निर्णय त्यांनी स्वत: घेतला असल्याचं सांगितलंय.

एआर. रहमान आणि मोहिनी डेच्या नात्याबद्दल चर्चा : वंदना यांनी म्हटलं, 'प्रत्येक लग्नात चढ-उतार येत असतात आणि त्यांच्यासोबतही असेच काहीसे घडत होते, मला आनंद आहे की त्यांनी एकमेकांच्या निर्णयावर आनंद व्यक्त केला आणि वेगळे होण्याचा निर्णय घेतला. विभक्त झाल्यानंतरही रहमान आणि सायरा नेहमीच एकमेकांच्या बाजूनं उभे राहतील. एआर. रहमान आणि सायरा यांना तीन मुले आहेत. दाम्पत्याची मुलेही त्यांच्या निर्णयाला सध्या पाठिंबा देत आहेत. सध्या आर्थिक मुद्द्यावर या जोडप्यांमध्ये कोणतीही चर्चा झालेली नाही. हा निर्णय दोघांनी परस्पर घेतला आहे. एआर रहमान आणि सायरा बानो यांच्या कोणतेही मतभेद नसल्याचं सांगितलं जात आहे.एआर. रहमान आणि मोहिनी डे सोशल मीडियावर ट्रोल : एआर रहमान पत्नीपासून विभक्त झाल्यानंतर काही तासांनंतर, त्यांच्या टीममधील मोहिनी डेनं स्वत:ला तिच्या पतीपासून वेगळे केले. यानंतर इंटरनेटवर गोंधळ निर्माण झाला. सोशल मीडियावर काही फोटो व्हायरल झाले. यामध्ये एआर. रहमान आणि मोहिनी डे एकत्र असल्याचे दिसले होते. यानंतर अनेकांनी एआर. रहमान आणि मोहिनी डेला सोशल मीडियावर ट्रोल करण्यास सुरुवात केली. आता या बातम्या अफवा असल्याच स्पष्ट झालं आहे.

### मतदान संपताच भाजपने ग्राऊंड लेव्हलवरुन माहिती मागवली, बुथ लेव्हलच्या एक्झिट पोलचा निकाल?

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यातील विधानसभा निवडणुकीचे मतदान संपल्यानंतर आता सर्वांनाच निकालाची उत्सुकता लागली आहे. मतदान संपल्यानंतर विविध संस्थांचे एक्झिट पोल्सचे निकाल जाहीर झाले होते. यामध्ये महायुती आणि महाविकास आघाडीच्या बाजूने संमिश्र कौल पाहायला मिळाले होते. त्यामुळे राज्यात नक्की कोणाची सत्ता येणार, याबाबत आणखीनच संभ्रम निर्माण झाला होता. परिणामी आता सगळ्यांचे डोळे २३ तारखेच्या निकालाकडे लागले आहेत. अशातच आता भाजपचा बुथ लेव्हलच्या एक्झिट पोलचा निकाल समोर आला आहे.

राज्यात बुधवारी मतदान संपल्यानंतर भाजपने बुथ लेव्हलवरुन माहिती गोळा केली होती. या एक्झिट पोलनुसार विधानसभा निवडणुकीत महायुतीला १६४ जागा तर महाविकास आघाडीला अवघ्या १०० जागा मिळण्याची शक्यता आहे. तर अपक्ष व इतर उमेदवारांना २४ जागांवर विजय मिळेल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

भाजपच्या या बुथ लेव्हल एक्झिट पोलच्या अंदाजानुसार, महायुतीमध्ये भाजपला १००, शिंदे गटाला ४२ आणि अजितदादा गटाला २२ जागांवर विजय मिळेल, अशी शक्यता वर्तविण्यात आली आहे. तर महाविकास आघाडीत काँग्रेसला ४०, शरद पवार गटाला ३५ आणि उद्धव ठाकरे गटाला २५ जागा मिळण्याची शक्यता आहे. परंतु, प्रत्यक्षात निकाल काय लागणार, याचा फैसला २३ नोव्हेंबरला होईल.

# विधानसभेच्या मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

## सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरूवात, प्रत्येक विधानसभेसाठी १४ टेबल पोलीसांचा चोख बंदोबस्त; ११५ उमेदवारांच्या भाग्याचा फैसला

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर, बुलढाणा, चिखली, सिंदखेड राजा, मेहकर, खामगांव व जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान झाले असून मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. मतमोजणीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून प्रचंड पोलीस बंदोबस्तात होणाऱ्या मतमोजणीतून सात विधानसभेच्या ११५ उमेदवारांच्या भाग्याचा फैसला होणार आहे. मतमोजणीसाठी प्रत्येक विधानसभा क्षेत्रासाठी १४ टेबल असणार आहे.

**मतमोजणी ठिकाण याप्रमाणे**

२१-मलकापूर विधानसभा येथील मतमोजणी कृषी उत्पन्न बाजार समिती, बेलाड यार्ड मलकापूर, २२-बुलढाणा विधानसभा येथील मतमोजणी निवडणूक विभाग इमारत, तहसिल चौक मागे बुलढाणा, २३-चिखली विधानसभा येथील मतमोजणी तालुका क्रिडा संकुल बॅडमिंटन हॉल चिखली, २४-सिंदखेडा राज विधानसभा येथील मतमोजणी महाराष्ट्र राज्य वखार सहकार गोदाम, कृषी उत्पन्न बाजार समिती परिसर सिंदखेड राजा, २५-मेहकर विधानसभा येथील मतमोजणी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ गोदाम क्रमांक ५ मेहकर, २६-खामगांव विधानसभा येथील मतमोजणी सरस्वती विद्या मंदिर हॉल खामगाव, २७- जळगाव जामोद विधानसभा येथील मतमोजणी नवीन प्रशासकीय इमारत जळगाव जामोद येथे होणार आहे.



**मतमोजणीच्या फेऱ्या**

**मतदानाची विधानसभा याप्रमाणे**

विधानसभेच्या मतमोजणीस त्या-त्या ठिकाणी सकाळी ८ वाजता सुरुवात होणार असून मतदारांच्या संख्येनुसार फे-या होणार आहेत. यात मलकापूर २२ फेऱ्या , बुलढाणा फेऱ्या २४, चिखली २३ फेऱ्या, सिंदखेड राजा २५ फेऱ्या, मेहकर २५ फेऱ्या, खामगांव २३ फेऱ्या व जळगाव जामोद २३ फेऱ्या होतील. प्रथम टपाली मतदानाची मतमोजणी होईल व त्यानंतर ईव्हीएम मतमोजणीस सुरुवात होईल. मतमोजणीसाठी सातही विधानसभा मतदारसंघात प्रत्येक टेबलवर प्रत्येकी एक कोतवाल, मतमोजणी अधिकारी, पर्यवेक्षक व सूक्ष्म निरीक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

**मतदारसंघनिहाय अंतिम टक्केवारी याप्रमाणे**

मलकापूर विधानसभा मतदारसंघात ७१.१७, बुलढाणा विधानसभा मतदारसंघात ६२.३९, चिखली विधानसभा मतदारसंघात ७२.०७, सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात ७०.२२, मेहकर विधानसभा मतदारसंघात ६८.९७, खामगांव विधानसभा मतदारसंघात ७६.०६, जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात ७३.५४ असे एकूण ७०.६० टक्के अंतिम सरासरी मतदान झाले. २१ लक्ष ३४ हजार ५०० मतदारापैकी १५ लक्ष ६ हजार ९२५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये ७ लक्ष ९१ हजार ८७ पुरुष, ७ लक्ष १५ हजार ८२२ महिला तर १६ तृतीयपंथीय मतदरांनी मतदान केले.

## निवडणूक विषयक कामात कसूर; मराठी उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापकाविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मतदान साहित्य वाटपाच्या वेळी अनुपस्थित राहून कामात कसून केल्या प्रकरणी नांद्राकोळी येथील मराठी उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापकाविरूद्ध पोलीस स्टेशन, बुलढाणा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुलढाणा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या शिफारसीनुसार तक्रार दाखल केली आहे..

निवडणूकविषयक कामकाजासाठी अधिकारी कर्मचाऱ्यांची नेमणूक करुन दि. १९ नोव्हेंबर रोजी मतदानाचे साहित्य वाटपाचे नियोजन करण्यात आले होते. यावेळी मराठी उच्च प्राथमिक शाळा नांद्राकोळी येथील मुख्याध्यापक मतदानाचे साहित्य वाटप होत असलेल्या ठिकाणी मतदान केंद्राचे साहित्य घेण्यास अनुपस्थित होते. ही बाब निवडणूक कामकाजात अळथळा निर्माण केला असून लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ चे कलम १३४ अन्वये कर्तव्यात कसूर केला आहे. त्यानुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या शिफारसीनुसार मुख्याध्यापक यांच्या विरुद्ध पोलीस स्टेशन बुलढाणा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर बाब जिल्हा परिषदचे जिल्हा सेवा वर्तणूक नियम १९६७ मधील कलम ३ चा भंग केला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गटविकास अधिकारी तथा सहायक निवडणूक अधिकारी यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर मुख्यध्यापकास नियम १९६७ मधील कलम ३ तरतूदीनुसार निलंबनाचा आदेश पारित केला आहे. निलंबन कालावधी त्यांचे मुख्यालय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांचे कार्यालयाकडून प्राप्त आदेशाप्रमाणे मुख्यालय राहील, अशी माहिती पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांनी प्रसिद्ध पत्रकाव्दारे कळविले आहे.

## जिल्हास्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धा संपन्न



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बुलढाणा :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद - बुलढाणा व किकबॉक्सिंग स्पोर्ट्स अससोसिएशन महाराष्ट्र, बुलढाणा यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धा- बुलढाणा येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे क्रीडा पर्यवेक्षक मनोज श्रीवास सर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या.

यामध्ये सरस्वती विद्यालय पांग्रा डोळे, ता. लोणार, जि. बुलढाणा येथील इयत्ता ११वी मधील विद्यार्थी ओम गजानन मुंढे या विद्यार्थ्याने १९ वर्ष गटात -५६ वजन गटात किकबॉक्सिंग क्रीडा स्पर्धेत जिल्ह्यातून प्रथम क्रमांक प्राप्त करुन त्याची २५ नोव्हेंबर रोजी अमरावती येथे होणाऱ्या विभागीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सदर स्पर्धेसाठी क्रीडा शिक्षक श्री अनिल थोरवे सर यांचे सहकार्य लाभले तर रामप्रसाद सोनुने सर यांचे प्रशिक्षण लाभले.

तसेच प्राचार्य समाधानजी तारे सर व किकबॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री निलेश शेलार सर यांचे मार्गदर्शन लाभले.

## काँग्रेसकडून आमदारांसाठी विशेष विमानाची व्यवस्था; विजयाची शक्यता असलेल्या अपक्ष आमदारांशीही संपर्क

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी काल मतदान झाले. काँग्रेसला विदर्भात मोठ्या विजयाचा विश्वास आहे. येथील ६२ जागांपैकी ३५ ते ४० जागा मिळतील, अशी अपेक्षा काँग्रेसला आहे. त्यामुळे मतदान होताच नियोजन सुरू झाले आहे.

मतदानाचा टक्का वाढल्यानंतर काँग्रेसचा आत्मविश्वास प्रचंड वाढला आहे. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यावर पूर्व विदर्भातील आमदारांच्या व्यवस्थेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. काँग्रेसच्या आमदाराशी दगाफटका होऊ नये म्हणून खबरदारी घेण्यात येत आहे. २३ नोव्हेंबरला निकाल येताच आमदारांना सुरक्षितस्थळी हलविण्यासाठी विशेष विमानाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच निवडून येण्याची शक्यता असलेल्या अपक्ष उमेदवारांच्या संपर्कात राहण्याची जबाबदारी विजय वडेट्टीवार यांच्यावरच सोपवण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे मतदान पार पडल्यानंतर लगेचच 'एक्झिट पोल्स'चे अंदाज यायला सुरुवात झाली. जवळपास सर्वच पोल्सनी महायुतीची सत्ता पुन्हा येणार असल्याचा अंदाज व्यक्त केला. महाविकास आघाडीही बहुमतापासून किंचित लांब असल्याचे दिसते आहे. त्यामुळे प्रत्यक्ष निकाल आल्यानंतरच निकालाचे खरे चित्र समजू शकेल. मात्र तत्पूर्वी 'एक्झिट पोल्स'नी पक्षनिहाय जे अंदाज व्यक्त केले आहेत, त्यावरून काँग्रेस तयारीला लागले आहे.

लोकसभा आणि हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या वेळी विविध वृत्तवाहिन्या आणि संस्थांचे अंदाज साफ चुकले असताना राज्य विधानसभा निवडणुकीतही विविध संस्थांनी संमिश्र अंदाज वर्तविले आहेत. काही संस्थांनी महायुती आणि महाविकास आघाडीत फार अंतर नसेल, असा अंदाज व्यक्त केला आहे. रिंगणातील सहा पक्ष, छोटे पक्ष तसेच बंडखोरांमुळे नेमके चित्र स्पष्ट होत नाही. मात्र, काँग्रेसला विदर्भात मोठ्या विजयाचा विश्वास आहे. पण, भाजपची राजकारणाच्या शैली आता जगजाहीर आहे. त्यामुळे काँग्रेस कुठलाही धोका पत्करण्यास तयार नाही. त्यासाठी आतापासून पावले टाकली जात आहेत. आमदारांना कुठल्याही प्रकारचा दगाफटका होऊ नये म्हणून आमदारांना सुरक्षित स्थळी तातडीने नेण्यासाठी विशेष विमान नागपुरात सज्ज ठेवण्यात आले आहे, अशी माहिती आहे.

### विश्वचषक गाजवणाऱ्या टीम इंडियाच्या खेळाडूवर जर्मनीत सर्जरी; नेमकं काय घडलं?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय क्रिकेट संघाचा फिरकीपटू कुलदीप यादव सध्या दुखापतीने त्रस्त आहे. कुलदीप यादववर नुकतीच जर्मनीत शस्त्रक्रिया झाली. कुलदीप यादवने सोशल मीडियाच्या माध्यमातून जर्मनीमधील काही फोटो शेअर केले होते. दुखापतीमुळे कुलदीप यादवला बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या मालिकेत संघात स्थान मिळू शकले नाही. बॉर्डर-गावसकर ट्रॉफी २०२४-२५ मधील पाच कसोटी सामने भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळले जाणार आहेत. ऑस्ट्रेलियामध्ये होणारी ही ट्रॉफी २२ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२५ च्या दृष्टिकोनातून दोन्ही संघांसाठी ही मालिका खूप महत्त्वाची असेल. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२५ च्या अंतिम सामन्यात दाखल व्हायचे असल्यास भारताला ४-१ अशा फरकाने ऑस्ट्रिलायविरुद्धची कसोटी मालिका जिंकावी लागेल.

# केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी शिवसैनिकांसमावेत बघितला द साबरमती रिपोर्ट

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी संपल्यानंतर आज केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी शिवसैनिकांसमावेत द साबरमती रिपोर्ट हा चित्रपट बघितला






राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून २० नोव्हेंबरला सर्वत्र मतदानाची प्रक्रिया पार पडली या निवडणुकीत शिवसेनेचे स्टार प्रचारक म्हणून केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्यभर प्रचार सभा घेतल्या निवडणुकीच्या व्यस्तते मधुन थोड वेळ मिळाल्यानंतर आज २१ नोव्हेंबरला केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी शिवसैनिकांसमावेत मेहकर येथील सिनेमार्क टॉकीज मध्ये द साबरमती रिपोर्ट हा चित्रपट बघितला.. द साबरमती रिपोर्ट ह्या चित्रपटांमध्ये गुजरात येथील गोध्रा स्टेशनवर साबरमती एक्सप्रेसमध्ये बसलेल्या राम भक्ताच्या धक्कादायक हत्याकांडाची वास्तव कथा या चित्रपटांमध्ये दाखवण्यात आली आहे .गुजरातमधील गोद्रा हत्याकांडाविषयी अनेक भ्रमक गोष्टी समाजामध्ये पसरविल्या गेल्या आहेत त्या हत्याकांडाविषयीची वास्तवता लोकांना आणि शिवसैनिकांना समजली पाहिजे या दृष्टिकोनातून केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी आपल्या शिवसैनिकांसमावेत आज हा चित्रपट बघितला गोध्रा हत्याकांडाचं वास्तव हे सर्वसामान्यांनाही सांगावं अस आवाहन त्यांनी उपस्थित शिवसैनिकांना केले यावेळी त्यांच्यासोबत शिवसेनेचे मेहकर विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार डॉ संजय रायमुलकर मेहकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव युवा सेना जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव शिवछत्रपती मंडळाचे अध्यक्ष नंदू भाऊ मापारी माजी उपसभापती श्री तुपे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.